
**सुनील दत्तात्रय राणेः**

**कुशल शिक्षणतज्ञ, राजनीतिज्ञ आणि राष्ट्रभक्त समाज सेवी**



सुनिल राणे यांचा जन्म दि. ३ सप्टेंबर, १९६३ रोजी मुंबई येथे झाला. आव्हानांचे संधींमध्ये रूपांतर करण्यासाठी त्यांनी लहानपणापासूनच कठोर परिश्रम आणि धैर्याचा मंत्र आत्मसात केला आहे. पदवीनंतर ते भारतीय क्रिकेट संघात सामील होऊन क्रिकेटचे जागतिक दिग्गज मानले जाणाऱ्या खेळाडूंसोबत सहभागी झाले. नैरोबी, लंडन क्रिकेट संघ, कंगा लीग आणि काउंटी क्रिकेट यासारख्या आंतरराष्ट्रीय खेळांचेही ते सदस्य राहिले आहेत.

भारतीय शिक्षण व्यवस्था ही केवळ भारतात नव्हे तर जगात महत्वाची मानली जाते. विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक क्षमता विकसित करण्यास चालना देणाऱ्या तसेच त्यांच्यात जबाबदाऱ्यांची आणि नीतिमूल्यांची जाणीव दृढ करणाऱ्या पोषक अशा जागतिक दर्जाच्या शैक्षणिक वातावरण निर्मितीच्या उद्देशाने सन १९९८ साली अथर्व शैक्षणीक संस्थेची स्थापना केली. उत्कृष्ठ व नाविण्यपूर्ण दर्जाचे शिक्षण देणाऱ्या व त्या आधारेच चालणाऱ्या शिक्षण संस्थेचा विकास करण्यासाठी अनेक अवघड आव्हानांचा सामना करून त्यातून योग्य पर्याय व मार्ग काढून पुढे अथर्व अभियांत्रिकी महाविद्यालयाची सुरूवात झाली. A+ नॅक नामांकीत अथर्व अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या परिसरात विद्यार्थ्यांना कारखान्यांतील अद्ययावत ऑटोमेशन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यासाठी पूर्ण क्षमतेचा कुका रोबोट आहे. रोबोटिक्समध्ये आधुनिक तांत्रिक शिक्षण प्रदान करणारे अथर्व हे भारतातील महत्वाचे केंद्र आहे. या सुविधेत अत्याधुनिक ग्राऊंड स्टेशन आणि ट्रॅकिंग सिस्टमदेखील आहे. सृजनशील अभियांत्रिकी डिझाइन्समध्ये नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी नवी आय-लॅब सुद्धा विकसीत केली आहे.

पुढे शिक्षणातील विविध पर्यायांचा अभ्यास करून सुनिल राणे यांनी अथर्व इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट बिझनेस स्कुल (MBA), इन्फॉर्मेशन एन्ड टेक्नॉलॉजी, हॉटेल मॅनेजमेंट, फॅशन एन्ड आर्टस्, नाट्य आणि परफॉर्मिंग आर्ट्स महाविद्यालय आणि फिल्म अँड टेलिव्हिजनच्या स्थापनेसह ललित कला शिक्षणात विविधता आणली. तसेच नवीन AR/VR सेंटर ऑफ एक्सलन्स डिजाईन, डेव्हलपमेंट आणि टेस्टिंग ऑफ ऍडवान्सड वर्चुअल एन्व्हायर्मेंट प्लॅटफॉर्म विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिला. मुंबईतील उद्योगांच्या विकासाचा केंद्रबिंदू ठरणाऱ्या सॅटेलाईट आयटी पार्कची अथर्व ग्रुप मार्फत लवकरच धारीवली गांव, मालाड (प) येथे उभारणी करणार आहे.

सामाजिक कल्याणासाठी अथर्व फाऊंडेशन संस्थेची स्थापना आणि यश या मागे सुनील राणेंचे दूरदर्शी नेतृत्व आहे. भारतातील महिला, मुले आणि युवकांना प्रशिक्षित करणे हा अथर्व फाउंडेशनचा मुख्य उद्देश आहे. ग्रामीण भागातील मुलींचे शिक्षण देणे, शैक्षणिक साहित्य पुरविणे, शहीद जवानांच्या कुटुंबांचे कल्याण व महिला सक्षमीकरण करणे, खेळाडूंना प्रोत्साहन देणे असे विविध उपक्रम अथर्व फाऊंडेशनच्या माध्यमातून वेळोवेळी राबविले जातात.

देशाचे रक्षण करताना अदम्य धैर्य दाखवणाऱ्या शूरवीरांचे शौर्य आणि देशासाठी केलेल्या बलिदानाचे स्मरण करून त्यांना सन्मानित करण्यासाठी सुनील राणे यांच्या मार्गदर्शनाखाली अथर्व फाऊंडेशन 'वन फॉर ऑल, ऑल फॉर वन" हा देशातील सर्वात मोठा कार्यक्रम आयोजित करतात. या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशाच्या विविध भागातील शहीद सैनिकांच्या कुटुंबियांना भेटून कुटुंबातील सदस्यांचा सन्मान केला जातो. शहीद सैनिकांच्या मुलींना आधुनिक शिक्षण देण्यासाठी त्यांना लॅपटॉप व इतर शैक्षणिक साहित्याची मदत केली जाते.

रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने पर्यटनाच्या माध्यमातून देशातील तसेच परदेशातील पर्यटकांना आकर्षित करून त्यांना उच्चतम सोई सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कोकणातील रत्नागिरी मध्ये गणपतीपुळे जवळ "ब्ल्यू ओशन रिसॉर्ट व स्पा" ची सुरूवात केली. निसर्गाला कोणतीही बाधा न आणता तेथील वनसंपदा, माती आणि निसर्ग रक्षणाच्या विचारासह आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने पर्यावरणाशी सलगी असलेला असा हा प्रकल्प सुनिल राणे यांच्या दूरदृष्टीतून विकसीत करण्यात आला.

महाराष्ट्राचे भूतपूर्व तांत्रिक आणि उच्च शिक्षण मंत्री दत्तात्रय राणेंच्या राजकीय संघर्षाने व कामगिरीने प्रभावित होऊन सुनील राणे यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरूवात नव्वद च्या दशकात केली. १९९८ मध्ये भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र युवा संघटनेचे उपाध्यक्ष, दक्षिण मध्य मुंबईचे जिल्हा सरचिटणीस, दक्षिण मध्य मुंबई जिल्हाध्यक्ष, मुंबई सरचिटणीस, शिवडी आणि वरळी येथून विधानसभा निवडणूक लढवली आणि २०१९ मध्ये बोरिवली विधानसभेतून आमदार म्हणून ९५,००० हून अधिक मतांच्या फरकाने निवडून आले. सुनिल राणे यांच्या मागे त्यांच्या वडलांची पुण्याई आहेच परंतु त्यांचे स्वतःचे कष्टही महत्त्वाचे आहेत. अत्यंत थोड्या कालावधीत जनमानसातील एक सन्मानित व्यक्तीमत्व म्हणून त्यांचे नेतृत्व उदयास आले.

२०१९ ते २०२४ पर्यंत त्यांनी बोरीवलीचे आमदार म्हणून काम केले आणि अनेक विकास कामांमध्ये योगदान दिले. कोविड-१९ दरम्यान १०,००० हून अधिक नागरिकांचे लसीकरण केले, आरोग्य तपासणी, उपचार व रक्तदान शिबीर राबविले. बोरिवलीतील अनेक मुलींना सायकल, आयपॅड, टॅबलेट, लॅपटॉप आणि शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून मदत केली. त्यांनी युवकांना आंतरराष्ट्रीय खेळांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करून अत्याधुनिक बास्केट बॉल / बॉक्सिंग रिंक / स्केटिंग रिंक/ क्रिकेट मैदान / तिरंदाजी / रायफल नेमबाजी मैदाने तयार करून प्रशिक्षणही सुरू केले. वेळोवेळी सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले. महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी योग्य ती मदत केली. बेरोजगार तरुणांसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन केले. तसेच बोरिवलीच्या पोलीस ठाण्यांमध्ये अत्याधुनिक संगणक, लॅपटॉप, प्रिंटरचे वाटप केले. संरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. बोरिवलीमध्ये पर्यटनाला चालना देण्यासाठी मॅन्ग्रोव्ह पार्क विकसीत केले. दुर्गम गावातील रस्त्यांवर सौर दिवे बसविले, झोपडपट्टीत राहणाऱ्या नगरीकांना शासनाच्या माध्यमातून पक्की घरे उपलब्ध करून दिली, गोराई मनोरी गावातील कोळी बांधवांना नैसर्गिक आपत्तीमध्ये सहकार्य केले. बोरिवलीच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना राबवण्यात आल्या आणि जनहितार्थ विकास कामे करण्यात आली.

या व्यतिरीक्त सुनिल राणे यांनी चिल्ड्रन एड सोसायटी मध्ये कार्यकारी अध्यक्ष म्हणून कामकाज पाहिले. तसेच गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र सरकार द्वारा बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून कामकाज पाहिले.

महाराष्ट्र राज्य गिरणी कामगार संनियंत्रण समितीच्या अध्यक्ष पदी नियुक्ती झाल्यावर गिरणी कामगारांच्या समस्या जाणून घेऊन योग्यती कार्यवाही करून महाराष्ट्रातील २००० हून अधिक गिरणी कामगारांना माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते पनवेलच्या कोन गाव येथील इमारतींमध्ये घरांचे वाटप केले व दिर्घकाळापासूनचा प्रलंबीत मुद्दा त्यांनी मार्गी काढला.

विधानसभा अधीवेशनामध्ये उपस्थित राहून आरोग्य, शिक्षण, सामाजिक विकास, पर्यावरण आणि अतिक्रमण यांसारख्या मुद्यावर लक्षवेधी सूचना, तारांकीत व चर्चेच्या माध्यमातून प्रश्न उपस्थीत केले व शासनाला अवगत केले.